प्रेस नोट दिनांक १८/०३/२०२१

| | | |
|---|---|---|
| १ | ला.प्र.वि.कार्यालय | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई. |
| २ | गु.र.क्र | १६/२०२१ |
| ३ | कलम | कलम ७, ७ (अ) ला.प्र.वि. कायदा १९८८ |
| ४ | आरोपीचे नांव कार्यालयाचा पत्ता | १ श्री. संदिप कारभारी गिते वय ४१ वर्षे, दुयम अभियंता, ( अति. कार्यभार – सहायक अभियंता ) ए वार्ड, म.न.पा. फोर्ट, मुंबई<br>२ मुझफर बाबु अली सय्यद उर्फ बबलू वय ४७ वषे, (खाजगी इसम) |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | **रुपये २७,००,०००/–** |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | **रुपये ५,००,०००/–** |
| ७ | हस्तगत लाचेची रक्कम | **रुपये ५,००,०००/–** |
| ८ | थोडक्यात हकीगत | यातील तक्रारदार यांचा ससुन डॉक येथे मासेमारीचा व्यवसाय आहे. तक्रारदार यांनी ससुन डॉक येथे बीपीटीच्या मालकीच्या पडिक जागेवर बोटींचे सामान व खलाश्यांना राहणेकरिता गोडावून बांधण्याची परवानगी मिळणेकरिता म.न.पा, अे वार्ड, कार्यालय, फोर्ट, मुंबई येथे अर्ज दिला होता. सदर जागेवर गोडावून बांधकाम करण्याकरीता त्यांचे परिसरातील अनेक बांधकामे केलेल्या बबलु नावाचे कंत्राटदारास काम दिलेले होते. सदर अर्जाबाबत तक्रारदारांनी कंत्राटदार बबलु यांची बीएमसी कार्यालयातील अधिकाऱ्यांशी ओळख असल्याने बबलू यांचेसोबत दि. ०८/०३/२०२१ रोजी अे वार्ड येथील आरोपीत लोकसेवकाची भेट घेतली असता, लोकसेवकाने परवानगी देण्याकरीता रू. २७,००,०००/– इतके लाच रक्कमेची तक्रारदाराकडे मागणी केली.<br>तक्रारदारांना लोकसेवकास लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १५/०३/२०२१ रोजी लाप्रवि कार्यालयात तक्रार दिली. सदर तक्रारीची दिनांक १७/०३/२०२१ रोजी दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली. पडताळणीच्या वेळी लोकसेवकाने रू. २७,००,०००/– इतक्या रक्कमेची मागणी करून तडजोडी अंती रू.२५,००,०००/– इतकी रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. तसेच सदर रक्कमेचा पहिला हप्ता म्हणून **रू.५,००,०००/–** इतकी रक्कम खाजगी इसम बबलु यांच्याकडे देण्यास सांगितले.<br>त्यावरुन आज दिनांक १८/०३/२०२१ रोजी सापळा कारवाईचे आयोजन करण्यात आले. सापळा कारवाई दरम्यान खाजगी इसम नामे बबलु यांने लाचेची रक्कम फिर्यादीकडुन स्विकारली. यानंतर सदर लाचेची रक्कम लोकसेवकाने खाजगी इसमाकडुन स्विकारताना लोकसेवकास रंगेहात पकडण्यात आले. व लोकसेवकाकडुन लाचेची रक्कम **रुपये** ५,००,०००/– हस्तगत करण्यात आली म्हणुन गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

अलकदेशमुख १८/३

**( अलका स.देशमुख )**
सहा. पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०
संकेतस्थळ–acbmaharastra.gov.in
ईमेल– १) acbwebmail@mahapolice.gov.in
२) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
ऑनलाईन तक्रार अर्ज–www.acbmaharastra.net.टोलफ्रि. क्र. १०६४
दुरध्वनीक्र. ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क्र. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००

Scanned with CamScanner